


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २७८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२० मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# सामान्य जनतेचं कंबरडं मोडणार !

## एक-दोन नव्हे तब्बल इतक्या रुपयांनी पेट्रोल-डिझेल महागणार

### पेट्रोलमध्ये आता ३० टक्के इथेनॉल मिक्स करण्याची तयारी

भारताने आता जागतिक परिस्थिती आणि वाढत्या इंधन टंचाईच्या संकटामुळे पेट्रोलमध्ये ३० टक्के इथेनॉल मिसळण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने सध्या E20 योजनेला पुढे वाढवत आता E22, E25, E27 आणि E30 इंधनासाठी तांत्रिक तयारी सुरु केली आहे. याचा अर्थ भविष्यात पेट्रोलमध्ये २२%, २५%, २७% आणि ३०% पर्यंत इथेनॉल मिक्स केले जाऊ शकते. सरकारने हे पाऊल उचलल्याने संकेत मिळत आहे की आता सरकार परदेशी कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी करण्याच्या मनस्थितीत आहे.

१८ मे रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत Bureau of Indian Standards ने नव्या फ्युअल ब्लेंडसाठी मानके जारी केली होती. हे नवीन नियम १५ मे २०२६ पासून लागू झाले आहेत. आता देशभरात E20 फ्यूअलला लागू केले जात आहे, ज्यात पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिक्स केले जाते. सरकारचा नवा ३० टक्के इथेनॉल मिक्स करण्याचा निर्णय अशा वेळी आला आहे. जेव्हा अमेरिका आणि इराण युद्धामुळे महत्वपूर्ण समुद्री मार्ग होर्मुझ स्ट्रेट बंद आहे. हेच कारण आहे की जगात कच्च्या तेलाचा पुरवठ्यावर दबाव आला आहे.

**नव्या नियमात काय खास?**

नवीन BIS मानकात अशा इंजिन आणि वाहनांसाठी तांत्रिक नियम निश्चित केले आहेत, जे जास्त इथेनॉल असणाऱ्या पेट्रोलवर चालतील.यात फ्युअलची गुणवत्ता, ऑक्टेन स्तर, सल्फर मर्यादा, पाण्याचे प्रमाण, वाष्प दबाव, युद्धापासून सुरक्षा आणि फ्युअल स्थिरता सारख्या बाबींवर जोर देण्यात आला आहे. यात नियमांचा हेतू हे निश्चित करणे आहे की भविष्यात येणाऱ्या फ्लेक्स-फ्युअल आणि जास्त इथेनॉल सपोर्ट करणाऱ्या वाहनांना सुरक्षित आणि चांगल्या प्रकारे काम करता येईल.




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१९, मुंबई :** इराण आणि अमेरिका यांच्यातील युद्धामुळे कच्च्या तेलाच्या दरात मोठी वाढ झाली आहे. या वाढीचा परिणाम आता भारतातील पेट्रोल-डिझेलच्या किमतींवरही दिसू लागला आहे. इंधनाच्या दरात अवघ्या ४ दिवसात दोन वेळा वाढ करण्यात आली असून, १५ मे रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रतिलिटर ३ रुपयांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर १९ मे रोजी पुन्हा ९० पैशांची वाढ करण्यात आली. मात्र, तज्ज्ञांच्या मते ही वाढ अपुरी असून सरकारी तेल कंपन्यांचे नुकसान भरून काढण्यासाठी इंधन दरात आणखी मोठी वाढ करावी लागू शकते. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**तब्बल इतक्या रुपयांनी इंधन महागणार...**

कोटक इन्स्टिट्यूशनल इक्विटीज या ब्रोकरेज फर्मच्या अहवालानुसार, सध्याच्या परिस्थितीत पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रतिलिटर १३ ते १७ रुपयांपर्यंत अतिरिक्त वाढ होण्याची गरज आहे. कच्च्या तेलाच्या उच्च किमती आणि पश्चिम आशियातील तणावामुळे भारतावर आर्थिक दबाव वाढत आहे. फक्त सध्याची दरवाढ किंवा सोने आयात शुल्क वाढवण्यासारखे उपाय पुरेसे नसून, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अधिक कठोर आर्थिक पावले उचलावी लागू शकतात असंही या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

**तेल कंपन्या तोट्यात !**

कोटकच्या अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की, सध्याच्या दरवाढीनंतरही सरकारी तेल कंपन्यांना मोठ्या प्रमाणात तोटा सहन करावा लागत आहे. कमी वसुलीमुळे तेल कंपन्यांना दरमहा सुमारे २५ हजार कोटी रुपयांचे नुकसान होत असल्याचा अंदाज आहे. डिझेलवरील अंडर-रिकव्हरी सुमारे ११.४० रुपये प्रतिलिटर तर पेट्रोलवरील अंडर-रिकव्हरी १४.३० रुपये प्रतिलिटर इतकी असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे हे नुकसान भरून काढण्यासाठी इंधन दरात आणखी वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**टप्प्याटप्प्याने दर वाढवले जाणार**

इंडियन ऑइल कॉर्पोरेशनच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, ग्राहकांवर अचानक मोठा आर्थिक भार पडू नये आणि महागाई नियंत्रणात राहावी यासाठी इंधन दर टप्प्याटप्प्याने वाढवले जात आहेत. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनीही यापूर्वी सांगितले होते की, तेल कंपन्यांना दररोज सुमारे ७५० कोटी रुपयांचे नुकसान होत आहे. १५ मे रोजी झालेल्या दरवाढीनंतर या नुकसानीत काही प्रमाणात घट झाली असली तरी आगामी काळात इंधनाच्या किमती आणखी वाढण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे आगामी काळात सामान्य जनतेचे म हागाईमुळे कंबरडे मोडण्याची शक्यता आहे.

## धानिवरी दुर्घटनेतील १२ जणांवर बापुगाव येथे सामूहिक अंत्यसंस्कार; संपूर्ण परिसर शोकमग्न!



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१९, डहाणू (पालघर) :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील धानिवरी येथे सोमवारी झालेल्या भीषण अपघातात मृत्युमुखी पडलेल्या १२ जणांवर आज बापुगाव येथे सामूहिक अंत्यसंस्कार करण्यात आले. एकाच रांगेत सर्व मृतदेह ठेवून अंत्यसंस्कार करण्यात आल्याने उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू अनावर झाले. या हृदयद्रावक घटनेमुळे बापुगावसह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

अपघातातील मृतांमध्ये एकाच कुटुंबातील सदस्यांचाही समावेश असल्याने अनेक कुटुंबांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. एका पतीने आपल्या मुलीचा व पत्नीचा मृत्यू उघड्या डोळ्यांनी पाहिल्याची वेदनादायी घटना उपस्थितांना हेलावून टाकणारी ठरली. अंत्यसंस्कारावेळी नातेवाईकांचा आक्रोश आणि गावकऱ्यांचे अश्रू पाहून वातावरण अत्यंत भावनिक झाले होते.

या सामूहिक अंत्यसंस्कारासाठी राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके पालघरचे खासदार हेमंत सावरा यांच्यासह जिल्ह्यातील विविध आमदार व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी मृतांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करत शासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचा विश्वास दिला.

अपघातातील १७ जखमींवर सध्या डहाणू तालुक्यातील धुंदलवाडी येथील वेदांता रुग्णालयात उपचार सुरू आहेत. उपचारादरम्यान कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आदिवासी विकास विभागाने जखमींचे पालकत्व स्वीकारल्याची माहिती मंत्री अशोक उईके यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील तातडीने मदत जाहीर केल्याचे त्यांनी सांगितले.

जखमींच्या नातेवाईकांसाठी रुग्णालय ते गाव प्रवासाची तसेच राहण्याची संपूर्ण व्यवस्था आदिवासी विकास विभागाकडून करण्यात येत असून कोणालाही वाऱ्यावर सोडले जाणार नाही, असे आश्वासनही मंत्री उईके यांनी यावेळी दिले.

## धानिवरी भीषण अपघातावर संताप; ह्या अपघात नाही, व्यवस्थेने केलेला खून

### सुरक्षित क्रॉसिंगच्या अभावामुळे १३ जणांचा बळी गेल्याचा स्थानिकांचा आरोप





**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१९, डहाणू (पालघर) :** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील धानिवरी येथे झालेल्या भीषण अपघातानंतर परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या दुर्घटनेत १३ निरपराध नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर स्थानिक ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि आदिवासी बांधवांनी प्रशासनाच्या निष्काळजीपणावर गंभीर आरोप करत हा अपघात नसून व्यवस्थेने केलेला खून आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

धानिवरी परिसरातील खडकीपाडा आणि मालपाडा या दोन पाड्यांमध्ये सुमारे ७०० ते ८०० नागरिक वास्तव्यास असून, या भागातील ग्रामस्थांना दररोज जीव धोक्यात घालून राष्ट्रीय महामार्ग ओलांडावा लागत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सुरक्षित सर्विस रोड, भरणी, उड्डाणपूल किंवा योग्य क्रॉसिंगची व्यवस्था नसल्याने नागरिकांना रॉंग साईडने रस्ता पार करण्याशिवाय पर्याय राहत नसल्याचे स्थानिकांनी सांगितले.

सामाजिक कार्यकर्ते शैलेश तांबडा यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात धानिवरी येथील हा भाग ब्लॅक स्पॉट घोषित करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी अनेक वेळा हायवे प्रशासनाकडे केली होती, असा दावा केला आहे. याबाबत हायवे प्रशासनाचे अधिकारी सुहास चिटणीस यांच्याकडे वारंवार निवेदने देण्यात आली होती. मात्र प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला.

येथे तातडीने भरणी करा, सर्विस रोड उपलब्ध करून द्या आणि नागरिकांचे जीव वाचवा, अशी मागणी सातत्याने करण्यात येत होती. तरीही कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आली नाही. अखेर प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळेच १३ जणांना जीव गमवावा लागला, असा गंभीर आरोप तांबडा यांनी केला आहे.

दरम्यान, या दुर्घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली असून पालकमंत्री गणेश नाईक यांनीही घटनेबद्दल दु:ख व्यक्त केले आहे. मात्र केवळ आर्थिक मदत जाहीर करून सरकारची जबाबदारी संपत नाही, अशी भावना स्थानिक आदिवासी बांधवांनी व्यक्त केली आहे. पालघर जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकांनी अपघातस्थळाच्या पुढे कट असल्याचे म्हटले असले तरी तो कट तब्बल ६०० ते ७०० मीटर अंतरावर असल्याने महिला, वृद्ध आणि शाळकरी मुलांनी एवढे अंतर चालत जाऊन रस्ता ओलांडायचा का, असा सवालही स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे.

स्थानिक आमदार, खासदार, हायवे प्रशासन आणि संबंधित शासकीय यंत्रणांनी वेळेत लक्ष दिले असते तर ही दुर्घटना टाळता आली असती, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तसेच या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

यासोबतच धानिवरी येथील धोकादायक ब्लॅक स्पॉट तात्काळ सुरक्षित करण्यात यावा, स्थानिकांसाठी स्वतंत्र सर्विस रोड उभारण्यात यावा आणि कायमस्वरूपी सुरक्षित क्रॉसिंगची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे.

## मित्रांसोबत पोहायला गेलेल्या मुलाचा शेततळ्यात बुडून मृत्यू

### पारनेर तालुक्यातील बहिरोबाचीवाडी येथील घटना



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** शेततळ्यात पोहायला गेलेल्या ११ वर्षीय अल्पवयीन मुलाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (दि.१८) पारनेर तालुक्यातील तालुक्याच्या पठार भागावरील बहिरोबाचीवाडी येथे घडली. साई सिताराम देठे (वय ११) असे मृत अल्पवयीन मुलाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास साई आपल्या १० ते १२ लहान मित्रांसोबत शेततळ्यात पोहण्यासाठी गेला होता. साई हा पाठीला प्लास्टिकचा ड्रम बांधून पोहणे शिकण्याचा प्रयत्न करत होता मात्र,पोहत असताना अचानक त्याच्या पाठीला बांधलेला ड्रम निसटला. ड्रम सुटल्यामुळे साईचा पाण्याचा अंदाज चुकला आणि तो थेट शेततळ्याच्या खोल पाण्यात बुडू लागला. तो बुडाला हे इतर मुलांच्या लक्षात आले. त्याच्या मित्रांनी तातडीने मदतीसाठी आरडाओरड केला. काही वेळानंतर रस्त्याने जाणाऱ्या एका व्यक्तीला थांबवून मदत मागितली. त्या जागरूक नागरिकाने क्षणाचाही विलंब न लावता शेततळ्यात उडी घेतली आणि साई देठे याला पाण्यातून बाहेर काढण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी टाकळी ढोकेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच दुर्दैवाने त्याचा मृत्यू झाला होता. डॉक्टरांनी तपासून त्याला मयत घोषित केले. शवविच्छेदन करून सायंकाळी शोकाकुल वातावरणात अंत्यविधी करण्यात आला. आई वडिलांना एकुलता एक मुलगा साई यावर्षी इयत्ता पाचवीत शिक्षण घेत होता. या घटनेमुळे देठे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण गावासह परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

**पालकांनी लक्ष देण्याची गरज :**

गावाकडील शेततळे, तलाव किंवा पाण्याच्या ठिकाणी पोहण्यासाठी जाणाऱ्या तरुणांबाबत पालकांनी विशेष लक्ष देणे अत्यावश्यक झाले आहे. अनेक वेळा मुलांना पोहता येत नसतानाही ते धाडस करतात आणि अशा दुर्घटना घडतात.




## जावयाचे वाण, एक खुळचट परंपरा!

सौर वर्ष आणि चांद्र वर्ष यांच्यात दरवर्षी सुमारे ११ दिवसांचा फरक पडतो. हा फरक साचून तीन वर्षांत तो एका महिन्याइतका (सुमारे ३३ दिवस) होतो. ऋतू आणि सण यांची सुसंगती राखण्यासाठी हा अतिरिक्त महिना जोडला जातो, ज्याला 'अधिक मास' असे म्हणतात. सौर वर्षात ३६५ दिवस येतात, तर चांद्र वर्षात ३५४ दिवस असतात. त्यामुळे दरवर्षी ११ दिवसांचा फरक पडतो. तीन वर्षांनंतर हा फरक ३३ दिवसांचा होतो, जो अधिक मास किंवा 'धोंड्याचा महिना' बनतो.

धार्मिक परंपरेनुसार अधिक महिना विष्णूचा महिना मानला जातो. जावयाला विष्णूचे रूप मानले जाते. या महिन्यात जावयाला अनारसे, धोंड्याचे वाण दिले जाते. याशिवाय पुरणपोळी, आमरसाचे जेवण खाऊ घातले जाते. काही ठिकाणी सोनं किंवा चांदीच्या भेटवस्तू देण्याची प्रथा आहे. तसेच, लेक सुखी राहावी म्हणून जावयाचा आदर-सन्मान केला जातो. या महिन्यात जावयाला धोंडे म्हणजे पुरण भरून कणकेचे उकडलेले किंवा तळलेले गोड गोळे दिले जातात. हे गोळे गोल किंवा अंडाकृती, अगदी दगडासारखे असतात. त्यामुळे त्यांना 'धोंडे' म्हटले जाते. या पदार्थामुळेच अधिक मासाला 'धोंड्याचा महिना' असेही म्हटले जाते.

या महिन्यात स्वतःच्या जावयाला खुश करण्यासाठी सोन्याचे अलंकार, नवीन महागडे कपडे, दुचाकी किंवा चारचाकी वाहने देण्याची प्रथा वाढताना दिसते. सध्या अधिक मास सुरू झाल्याने जावयास वाण देण्याची परंपरा सुरू झाली आहे. या अंतर्गत कोल्हापुरात एका सासऱ्याने जावयाला वाण स्वरूपात तब्बल दीड किलो चांदीपासून बनवलेले, सुमारे साडेचार लाख रुपये किमतीचे वाहन भेट दिल्याची चर्चा आहे. सोन्या-चांदीच्या किंमती आभाळाला भिडलेल्या असताना, जर जावयाला वाण देण्याची लाट वाढली, तर अनेक सासऱ्यांना कर्जबाजारी होऊन जावयाचे लाड पुरवावे लागतील.

एखाद्या सुखवस्तू कुटुंबात आपली मुलगी दिली की मुलीच्या वडिलांचा घोर मिटतो, ही भावनिक गरज काळानुरूप अन्यायकारक बनत गेली. सरकारी नोकरी असलेल्या किंवा जमीन-जुमला, शेतीवाडी असलेल्या मुलाच्या आई-वडिलांकडून मुलीच्या वडिलांच्या अपेक्षांचा गैरफायदा घेतला जातो. हुंडा घेणे आणि लग्नानंतरही मानसन्मानाच्या नावाखाली अपेक्षा ठेवणे, ही प्रवृत्ती अजूनही कायम आहे. घरातील छोट्या-मोठ्या कार्यक्रमांत किंवा विवाहसमारंभांत जावयाला प्रथम खुश करण्यासाठी त्याला सोनं आणि चांगले कपडे द्यावे लागतात; अन्यथा जावईबुवा रुसून बसतात, अशी परिस्थिती निर्माण होते. जावयाचे लाड करता करता काही सासरेबुवा कर्जबाजारी झाल्याचे आपण पाहतो. मुलीचे सुख आणि आनंद यासाठी तिचा बाप आयुष्यभर कमीपणा घेत राहतो. मुलीचा कोणत्याही कारणाने छळ होऊ नये म्हणून तो सर्व तथाकथित रीतीरिवाज पाळत राहतो.

आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांना नेहमी दुय्यम स्थान देण्यात आले आहे. खरंतर पती-पत्नीच्या नात्यात स्त्रीच्या त्यागाची, कष्टाची आणि जबाबदारीची पुरेशी दखल घेतली जात नाही. आता मुली सुशिक्षित आणि कमावत्या बनल्या आहेत. अशा काळातही सासरवाडीकडून अपेक्षा बाळगणारे लालची जावई नाहीत असे नाही. परंपरा जपण्याच्या नावाखाली सासऱ्याला लुबाडण्याची संधी साधण्याच्या विचारात अनेक जावई टपलेले असतात. अशा जावयांना महात्मा फुले यांच्या स्त्रियांविषयीच्या सडेतोड विचारांचे डोस पाजण्याची आवश्यकता आहे.

**महात्मा ज्योतिबा फुले यांनी आपल्या सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तकात लिहिले आहे.**


स्त्रियांची जात फार अबला असल्यामुळे या लोभी व धाडसी पुरुषांनी मोठी कावेबाजी करून कोणत्याही कामांमध्ये स्त्री जातीची संमती घेतल्याशिवाय एकंदर सर्व पुरुषांनी आपलेच घोडे पुढे दामटले; त्यांस मानवी हक्क समजू देऊ नयेत, या इराद्याने त्यांस विद्या शिकवण्यास प्रतिबंध केला. यामुळे एकंदर सर्व स्त्रियांवर अशा तऱ्हेचा जुलमी प्रसंग येऊन गुदरला. स्त्रियांची जात अबला कशी, हे सांगताना महात्मा फुले लिहितात... आपणा सर्वांचे ती सतत रात्रंदिवस नऊ महिने उदरी ओझे वागवीत असता, तिजला कोणत्याच लोभी पुरुषासारखे छक्के-पंजे करून धाडसपणा करता येत नाही; यावरून स्त्रियांना अबला असे म्हणतात.

याचा परिणाम काय झाला, हे सांगताना ते पुढे लिहितात यावरून एकंदर सर्व जगात प्रथम पुरुषाच्या अत्यंत लोभामुळे हेवा, द्वेष, कृत्रिमपणा वगैरे नानाप्रकारचे दुर्गुण उत्पन्न होऊन सर्व प्रकारची पातके उदयास आली.

अशा प्रकारे महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्रियांच्या अबलेपणाचा फायदा घेऊन पुरुषांनी निर्माण केलेल्या खुळचट परंपरांचा समाचार घेतला आहे. आज स्त्रिया अबला राहिलेल्या नाहीत; त्या सबला बनल्या आहेत. अशा काळात समाजाने 'जावयाचे वाण' यांसारख्या खुळचट कल्पना मोडीत काढल्या पाहिजेत.

**– किशोर जाधव**

# शिक्षण क्षेत्राला लागलेला कलंक!




जळगाव जिल्ह्यात धरणगाव तालुक्यातील एका गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेतील शिक्षकानेच चौथीच्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थिनीचा लैंगिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी आरोपी शिक्षक मराठे याच्याविरुद्ध धरणगाव पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.व शिक्षकाला अटक केल्याची घटना वाचण्यात आली. पीडित मुलगी ही आपल्या कुटुंबीयांसह धरणगाव तालुक्यातील एका गावात राहते. ती जि. प. शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकत आहे. संशयित आरोपी शिक्षक मराठे हा तिला शाळा भरण्यापूर्वी सकाळी दहा वाजता झाडू मारण्याच्या बहाण्याने शाळेत बोलावून घेत असे. कुणी नसल्याचा फायदा घेऊन तो तिच्यासोबत घृणास्पद कृत्य करायचा. इतकेच नव्हे तर तिला मोबाइलवर अश्लील व्हिडिओ दाखवून तिचा लैंगिक छळ करत असल्याचा संतापजनक प्रकार पुढे आला आहे.

अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणामुळे समाजात संतापाची लाट उसळली आहे. याआधीही

बदलापूरमध्ये एका शाळेत २ अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना घडली होती

अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या उच्च माध्यमिक शाळेत एका शिक्षकाने अश्लिल व्हिडिओ दाखवत सहा विद्यार्थीनींचा छळ केल्याची ही घटना होती.

पुण्यातील भवानी पेठ भागात शाळेतील अशीच घडतात घडली होती

गेल्या काही महिन्यांमध्ये अशा प्रकारच्या बऱ्याच घटना आपल्यासमोर आलेल्या आहेत.परत परत त्या सांगण्याची आवश्यकता नाही.

'मुलगी शिकली, प्रगती झाली' हा संदेश घेऊन आज आपण एकविसाव्या शतकात वावरत आहोत.

आजच्या काळात मुलींनी प्रत्येक क्षेत्रात स्वतःला सिद्ध केले आहे.

डिजिटल इंडिया आणि प्रगतीच्या मोठ्या मोठ्या गप्पा मारत आहोत. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांनी अतोनात कष्ट सोसून, अंगावर शेण-दगड झेलून मुलींच्या शिक्षणाची पायाभरणी केली. त्यांच्याच प्रयत्नांमुळे आज आपल्या लेकी-सुना डॉक्टर, इंजिनिअर, पायलट आणि अंतराळवीर बनून देशाचे नाव उज्ज्वल करत आहेत.

परंतु, अलीकडच्या काळात शिक्षण क्षेत्रात घडणाऱ्या अशा काही कलंकित आणि दुर्दैवी घटनांमुळे या प्रगतीला ब्रेक लागण्याची भीती निर्माण झाली आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे, मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण पुन्हा कमी होईल की काय, अशी धास्ती संपूर्ण समाजात व्यक्त होत आहे.

शाळा आणि महाविद्यालये ही ज्ञानाची पवित्र मंदिरे मानली जातात. पालकांचा शिक्षकांवर आणि शैक्षणिक संस्थांवर देवासारखा विश्वास असतो. परंतु, काही नराधमांच्या विकृत मानसिकतेमुळे या पवित्र क्षेत्राला काळीमा फासला जात आहे. शाळांमध्ये अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार, छेडछाड आणि मानसिक छळ अशा घटनांमुळे संपूर्ण समाज सुन्न झाला आहे. ज्या हातांनी मुलींना लेखणी धरायला शिकवायची, त्याच हातांकडून जर विश्वासघात होत असेल, तर मुलींनी सुरक्षित कुठे राहायचे, हा मोठा प्रश्न आहे. शिक्षकांचे नीतिमत्तेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या अनुचित घटनांचे परिणाम अत्यंत दूरगामी आणि चिंताजनक आहेत.या काळ्या घटनांमुळे आज शिक्षण क्षेत्राला मोठा कलंक लागला आहे.

ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंतच्या पालकांच्या मनात आज तीव्र भीती निर्माण झाली आहे. 'मुलगी शिकली तर प्रगती होईल, पण ती सुरक्षित राहिली तरच ना?' असा उद्विग्न प्रश्न आज प्रत्येक आई-वडील विचारत आहेत.

या भीती मुळे अनेक पालक सुरक्षिततेच्या कारणास्तव मुलींना दूरच्या शाळा किंवा कॉलेजमध्ये पाठवणे बंद करत आहेत.

सुरक्षेची हमी नसल्यामुळे अनेक गरीब आणि मध्यमवर्गीय पालक मुलींचे शिक्षण मध्येच थांबवण्याचा विचार करू लागले आहेत.

अशा घटनांमुळे शिकणाऱ्या मुलींच्या मनात सतत एक प्रकारची भीती आणि दडपण असते. याचा थेट परिणाम त्यांच्या अभ्यासावर आणि गुणवत्तेवर होत आहे.

हा कलंक पुसण्यासाठी आणि मुलींचे शिक्षण अखंडित ठेवण्यासाठी खालील उपाययोजना तातडीने करणे गरजेचे आहे:

कठोर कायदे असले तरी अंमलबजावणी आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील गुन्हेगारांना फास्ट ट्रॅक कोर्टाद्वारे तात्काळ आणि कठोर फाशीसारखी शिक्षा झाली पाहिजे, जेणेकरून कोणाचीही अशी हिंमत होणार नाही.

सीसीटीव्ही आणि सुरक्षा प्रत्येक शाळेत, वर्गात आणि आवारात सीसीटीव्ही कॅमेरे बंधनकारक असावेत. शाळांच्या सुरक्षा व्यवस्थेचे दृष्टीने अंतर्गत तक्रार समिती असायला हवी. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत महिला शिक्षिका आणि पालकांची समिती असावी, जिथे मुली न घाबरता आपली तक्रार मांडू शकतील.

ग्रामीण भागातून येणाऱ्या मुलींसाठी हक्काची आणि सुरक्षित सरकारी बस सेवा किंवा शाळांची स्वतःची सुरक्षित वाहतूक व्यवस्था असावी. अशा वाहतूक व्यवस्थेतही बऱ्याच वेळा वाईट प्रकार घडतात त्यावरही संस्थाचालकांचे लक्ष असायला हवे.

शिक्षण क्षेत्रातील या विकृतींचा वेळीच बिमोड केला नाही, तर सावित्रीबाईंच्या लेकींचे शिक्षण धोक्यात येईल. हा केवळ एका मुलीचा किंवा कुटुंबाचा प्रश्न नसून संपूर्ण राष्ट्राच्या प्रगतीचा प्रश्न आहे. समाज, शासन आणि शैक्षणिक संस्थांनी मिळून मुलींना सुरक्षित आणि भयमुक्त वातावरण देणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. जेव्हा प्रत्येक मुलगी निर्भयपणे शाळेत जाईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने देशाचा विकास होईल.

'शिक्षण क्षेत्रात घडणाऱ्या क्लेशदायक घटना आणि त्यामुळे मुलींच्या शिक्षणावर निर्माण झालेली धास्ती निर्माण झालेली आहे त्यामुळेच अत्यंत वेदनेने आणि संतापाने विचारावेसे वाटते की, आज सावित्रीबाईंच्या लेकी खरोखरच सुरक्षित आहेत का?

जर मुली घरातच बसल्या, तर आपल्या देशाची अर्धी शक्ती अंधारात ढकलली जाईल. या विकृतीचा वेळीच बिमोड करणे ही आज काळाची गरज आहे.

यासाठी आपल्याला काही कठोर पावले उचलावी लागतील:

शाळा आणि कॉलेजांमध्ये नराधमांना पाठीशी घालणाऱ्या व्यवस्थापकांवर आणि दोषींवर फास्ट ट्रॅक कोर्टाद्वारे तात्काळ कठोर कारवाई झाली पाहिजे.



**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव**
**मोबा. ८९९९५६६९१७**

महिला सुरक्षा समित्या केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष कार्यरत असणे बंधनकारक केले पाहिजे.

मुलींना स्वसंरक्षणाचे धडे (Self Defense) देणे. आपल्या राज्यात शिक्षण विभागासाठी स्वतंत्र मंत्री आहे. जिल्हा परिषद मध्ये स्वतंत्र माध्यमिक शाळा आणि प्राथमिक शाळा यांचे जिल्हा शिक्षणाधिकारी आहेत. तसेच तालुका पातळीवर गटशिक्षणाधिकारी यांची नेमणूक असते. ते वेळोवेळी शाळांना भेटी देऊन एकूणच शाळेची तपासणी करत असतात. स्थानिक ग्रामपंचायत, नगरपालिका, नगरपरिषद, यांच्यामध्ये सुद्धा शिक्षण विभाग असतो. शिक्षण सभापती असतात त्यांची ही समिती असते. त्यांचे सुद्धा या शाळांवर नियंत्रण असायला हवे. शाळेची व्यवस्थापक कमिटी असते या कमिटीने सुद्धा शाळेतील शिक्षक येथील वातावरण शिक्षक मुला मुलीचे मध्ये असलेले संबंध याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. बऱ्याच दिवसापासून घटना घडत असते मग त्याकडे मुख्याध्यापक संस्थेचे सदस्य यांचे लक्ष कसे नसते.? हा सुद्धा एक विचार करण्यासारखा भाग आहे. शाळेमध्ये शिक्षकांच्या मोबाईल वापरावरही नियंत्रण आवश्यक आहे. कार्यालयीन वेळात मोबाईल बघणे किंवा शाळेमध्ये मोबाईल वापरावर बंधन असणे आवश्यक आहे.

शिक्षण क्षेत्राला लागलेला हा कलंक आपल्याला धुवून काढावाच लागेल. सावित्रीबाईंनी लावलेले हे शिक्षणाचे रोपटे सुकू द्यायचे नसेल, तर सरकार, समाज, शाळा आणि आपण सर्वांनी मिळून मुलींना एक सुरक्षित आणि भयमुक्त वातावरण दिले पाहिजे. जेव्हा प्रत्येक मुलगी न घाबरता, ताठ मानेने शाळेत जाईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने आपल्या देशाची प्रगती होईल.

नक्कीच, 'शिक्षण क्षेत्रात घडणाऱ्या क्लेशदायक घटना आणि त्यामुळे मुलींच्या शिक्षणा संदर्भात धास्ती निर्माण झालेली आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात–
झाली पाहिजे शिक्षणक्रांती, तरच लाभेल देशाला शांती...

परंतु आज आपल्या देशात शिक्षणक्रांती तर दूरच, पण शिक्षण क्षेत्राला लागलेल्या कलंकामुळे समाजात अशांतता आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामीण भागापासून ते शहरी भागापर्यंतच्या पालकांच्या मनात आज प्रचंड भीती निर्माण झाली आहे. आज एखादी मुलगी वेळेत शाळेतून घरी परतली नाही, तर आई-वडिलांच्या काळजाचा ठोका चुकतो. 'मुलगी शिकली तर प्रगती होईल, पण ती सुरक्षित राहिली तरच ना?' असा उद्विग्न प्रश्न आज प्रत्येक सामान्य कुटुंबात विचारला जात आहे.

विशेषतः ग्रामीण भागात, जिथे शाळा घरापासून दूर असतात, तिथे सुरक्षिततेची हमी नसल्यामुळे अनेक गरीब आणि मध्यमवर्गीय पालक मुलींचे शिक्षण मध्येच थांबवण्याचा विचार करू लागले आहेत. नको ते शिक्षण आणि नको ती नोकरी, माझी मुलगी घरात सुरक्षित राहिलेली बरी, ही मानसिकता पालकांमध्ये पुन्हा निर्माण होणे म्हणजे आपण वैचारिकदृष्ट्या शंभर वर्षे मागे जाण्यासारखे आहे.

ज्या मुली आज धैर्याने शाळा-कॉलेजमध्ये जात आहेत, त्यांच्या मनातही सुरक्षिततेची भीती सतत घर करून राहत आहे. रस्त्यावरून चालताना, बसमध्ये प्रवास करताना किंवा वर्गात बसतानाही जर मुलींच्या मनात असुरक्षिततेची भावना असेल, तर त्या मोकळेपणाने शिकणार कशा? भीतीपोटी घेतलेले शिक्षण कधीही उत्तम दर्जाचे असू शकत नाही.

जर देशातील निम्मी लोकसंख्या असणाऱ्या महिलांना आपण सुरक्षित वातावरण देऊ शकलो नाही, तर देशाचा विकास केवळ कागदावरच राहील. या विकृतीचा वेळीच बिमोड करणे ही आज काळाची गरज आहे.

यासाठी केवळ हळहळ व्यक्त करून चालणार नाही, तर आपल्याला काही कठोर आणि ठोस उपाययोजना कराव्या लागतील.

शिक्षण क्षेत्राला लागलेला हा कलंक आपल्याला सर्वांना मिळून धुवून काढावाच लागेल. शासन, प्रशासन, शाळा आणि समाज या सर्वांनी एकजूट होऊन मुलींना सुरक्षित आणि भयमुक्त वातावरण दिले पाहिजे.

ह्या गोष्टीवर विचार मंथन होणे अत्यावश्यक आहे.

**मुलगी वाचवा,**
**मुलगी शिकवा आणि मुलीला सुरक्षित ठेवा!**

## वारसा

जाणारा म्हणे जाता
मजलाबोलला असा
सांगत सुटता गुपिते
गहिवरून येतो घसा

खोटेबोले बिनधास्त
कुणी दिला रे व्हिसा
मिथ्या सांगे काहिही
भरताआपला खिसा

संबंध आमचे वेगळे
सांगता ताणून नसा
कसे बनवले श्रोत्यां
मनातले मनात हसा

मृता नावे बीलफाडे
आपणचं मारा ठसा
मीचं त्यांचा विश्वासू
ढोलके बडवत बसा

बना छान वारसदार
जाळ्या पकडे मासा
घोळातआणे सकला
टाकून जुगारी फासा

अपुरी राहिली इच्छा
सर्वांनाद्यायचे झासा
अ लिखित मृत्यू पत्र
आम्हांला मिळे वसा

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक दृष्टी, अचूक बातमी

# जागतिक मधमाशी दिन !

आज २० मे, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक मधमाशी दिन म्हणून साजरा केला जातो. अँतोन जोंसा या जगप्रसिद्ध मधुमक्षिका पालन तज्ज्ञाचा २० मे १७३४ रोजी स्लोव्हनिया या देशातील गरीब कुटुंबात जन्म झाला. त्यांनी १७६६ मध्ये युरोपात पहीले मधमाशी पालन केंद्र सुरू केले. १७७१ मध्ये त्यांनी मधुमाशीपालनावरील पहिले पुस्तक प्रकाशित केले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने २० मे २०१८ पासून २० मे हा दिवस जागतिक मधमाशी दिन म्हणून घोषित केला. या दिवशी मधमाशांचे संवर्धन करण्यासह कीटकांचे संवर्धन करण्यासाठी जनजागृती केली जाते.

मधमाशी हा पर्यावरणातील अतिशय महत्वाचा घटक आहे. मधमाशी हे जीवसृष्टीला मिळालेले सर्वोत्तम वरदान आहे. मधमाशीला सामाजिक कीटक असे म्हटले जाते. मधमाशा इतर किटकांप्रमाणे एकट्या दुकट्या राहत नाही तर त्या समूह करून राहतात. त्यांच्या घराला पोळे असे म्हणतात. एका पोळ्यात हजारो मधमाशा असतात. मधमाशा त्यांच्या अन्नाच्या पूर्ततेसाठी फुलातील मकरंद आणि पराग गोळा करतात. मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर परागकणांचे स्थलांतर करतात त्यामुळे फुलांची



बीजधारणा व फलधारणा होते त्यालाच परागीभवन असे म्हणतात. परागीभवनामुळे पीक उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ होते हे शास्त्रज्ञांनी सिद्ध करून दाखवले आहे त्यामुळे मधमाशा या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरत आहेत. तरीही मधमाशीपालनाबाबत आपल्याकडील शेतकरी अजूनही गंभीर नाहीत उलट मधमाशांचे पोळे जाळून त्यांना शेतातून हाकलून देण्याकडेच शेतकऱ्यांचा कल असतो. पूर्वी शेतात, बांधावर, आजूबाजूला सहज नजरेस पडणारी मधमाशांची पोळे आता दिसत नाही. मधासाठी पोळे जाळणे, कीटकनाशके फवारणे, मोबाईल टॉवर उभारणे, मधमाशांविषयी अज्ञान पसरवणे या कारणांमुळे मधमाशी सारखा उपयुक्त जीव नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. परिसरातील मधमाशा नष्ट झाल्या तर त्याचा पीक उत्पादनावर विपरीत परिणाम होऊ शकतो म्हणून आपण सर्वांनी मधमाशांच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी पुढे आले पाहिजे. मधमाशांची शास्त्रिय माहिती घेऊन तिचे संगोपन करण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. पराग सिंचनामुळे शेती उत्पादनात वाढ होत असल्याने मध व मेन या बाबीपेक्षा उत्पादनातील वाढ हा महत्वाचा घटक मानून शेतकऱ्यांनी मधमाशी पालनाला अग्रक्रम द्यायला हवा. सरकारनेही याबाबत शेतकऱ्यांचे प्रबोधन करायला हवे. रोजगार निर्मितीला वाव असल्याने मधमाशी पालन हा पूरक उद्योग म्हणून केल्यास ग्रामीण भागातील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. मधमाशी ही आपल्यासाठी अतिशय महत्वाचे काम करते. मधमाशांकडून शिकण्यासारखेही खूप आहे. समूहात राहून आदर्श जीवन कसे जगावे हे मधमाशांकडून शिकावे. दीर्घ कष्ट केल्याने मधासारखा गोड पदार्थ निर्माण करता येतो हे मधमाशांनी दाखवून दिले आहे. मधमाशी हा केवळ मानवासाठीच नव्हे तर संपूर्ण जीवसृष्टीसाठी अतिशय महत्वाचा घटक आहे. आपण सर्वांनी मधमाशी वाचवण्याचा पर्यायाने जीवसृष्टी वाचवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला तरच मधमाशी दिनाचे सार्थक झाले असे म्हणावे लागेल.

**– श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## खते विक्रेत्यांना नो लिकींगचे बोर्ड लावणे बंधनकारक



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१९, ठाणे :** आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना खतांचा सुरळीत, पारदर्शक व निर्बंधमुक्त पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी कृषी विभागाने खत विक्रेत्यांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत. खत खरेदी करताना इतर कृषी साहित्य, बियाणे किंवा औषधांची सक्तीने जोडणी (लिंकिंग) करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेनुसार आवश्यक तेवढे खत स्वतंत्रपणे खरेदी करण्याचा पूर्ण अधिकार असून, खत खरेदीसाठी इतर वस्तू घेण्याची अट घालणे हा नियमभंग मानला जाणार आहे. अशा तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित विक्रेत्यांचा परवाना निलंबित किंवा रद्द करण्यासह कायदेशीर कारवाई केली जाईल, असे कृषी विभागाने स्पष्ट केले.

जिल्ह्यातील सर्व कृषी निविष्ठा विक्री केंद्रांवर नो लिंकिंग असे फलक लावण्याचे निर्देश देण्यात आले असून, शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी विशेष मोहीमही राबविण्यात येणार आहे. तसेच खरीप हंगामात खतांचा तुटवडा होऊ नये यासाठी विविध कृषी निविष्ठा केंद्रांची नियमित तपासणी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

खत विक्री प्रक्रियेत कोणतीही अनियमितता आढळल्यास संबंधितांवर तातडीने कारवाई केली जाईल. शेतकऱ्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता, लिंकिंगची सक्ती होत असल्यास कृषी विभाग किंवा गुणवत्ता नियंत्रण अधिकाऱ्यांकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

कृषी विकास अधिकारी यांनी सांगितले की, शेतकऱ्यांना योग्य दरात आणि कोणत्याही अटींशिवाय खत उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही.

## आर्थिक विवंचनेतून इसमाची गळफास घेऊन आत्महत्या



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१९, विसापूर (चंद्रपूर) :** त्याने आयटीआय मध्ये जोडारीचे शिक्षण घेतले होते. जोडारीचे काम करून तो कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. मात्र नेहमी काम मिळत नसल्याने आर्थिक अडचण निर्माण झाली. अशातच त्याला दारुचे व्यसन लागले. कुटूंबाला हातभार लागावा म्हणून पत्नी एका ठिकाणी कामाला जात होती. नेहमी प्रमाणे ती घरी आली. मात्र पतीने पंख्याला गळफास लावून आत्महत्या केल्याचे दिसून आले. त्यावेळी तिने एकच आक्रोश केला. ही घटना विसापूर येथे सोमवार ( दि. १८ ) मे रोजी रात्री ८.४५ वाजता घडली. मृतक इसमाचे नंदकिशोर ढवस ( ४४ ) रा.साईबाबा वॉर्ड, विसापूर असे नाव आहे.

नंदकिशोर ढवस हा वेल्डिंग चे काम करून कुटुंबाचा गाडा हाकत होता. मात्र वेळेवर त्याला काम मिळत नव्हते. त्यामुळे घरात आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत होता. मुलगी व मुलाच्या शिक्षणाची त्याला चिंता सतावत होती. पतीची मिळकत कमी झाली. यामुळे पत्नी ज्योती ढवस एका खासगी आस्थापनेत कामाला जात होती. घटनेच्या दिवशी मुलगी व मुलगा गावातच राहत असलेल्या आजीआजोबा कडे संध्याकाळी गेली होती. नेहमी प्रमाणे नंदकिशोर ची पत्नी ज्योती रात्री ८.४५ वाजताच्या सुमारास घरी आली. घरी आल्यावर तिला पती ओढणीने घरातील पंख्याला गळफास लावलेल्या अवस्थेत आढळून आला. तिने एकच हंबरडा फोडला. या घटनेची माहिती विसापूर पोलीस चौकी ला देण्यात आली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून त्याचे शव उत्तरीय तपासणी साठी बल्लारपूर ग्रामीण रुग्णालयात हलविले. या घटनेचा पुढील तपास विसापूर चौकीचे पोलीस करत आहे.

## मुकेश सरवन यांची मीरा-भाईंदर महानगरपालिकेला भेट




**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.१९, मीरा-भाईंदर :** कामगारांच्या मागण्यांवर चर्चा झाल्यानंतर महिला कर्मचाऱ्याचा गंभीर अपघात झाला त्यांना ऑरबीत हॉस्पिटल मिरारोड खउण मध्ये ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य स्वच्छता कामगार आयोगाचे उपाध्यक्ष मुकेश सरवन यांनी आज मीरा-भाईंदर महानगरपालिकेला भेट दिली. या भेटीदरम्यान, त्यांनी स्वच्छता कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली आणि कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा केली.

**बैठकीत उपस्थित केलेले मुद्दे**

पत्रकार परिषद मध्ये अक्षराज चे पत्रकार घनश्याम आंबोकर नी विचारले की, सफाई कॉन्ट्रॅक्टर सफाई कामगारांना त्यांचा हक्काचा योग्य मोबदला दित नाही.त्याबाबत आपण काय करणार? हया प्रश्नाचे उत्तर देताना सांगितले की जर असं काही कॉन्ट्रॅक्टर करत असतील त्यांचे कॉन्ट्रॅक्ट रद्द करण्यात येईल.

बैठकीत किमान वेतन, कायमस्वरूपी नियुक्ती, सुरक्षा उपकरणे, आरोग्य विमा, कामाचे तास आणि कंत्राटी पद्धत बंद करण्याच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा झाली. कामगार संघटनेच्या प्रतिनिधींनी स्वच्छता कामगारांना भेडसावणाऱ्या अडचणी आणि समस्यांबाबत मुकेश सरवन यांना लेखी निवेदन सादर केले.

**पत्रकार परिषदेत दिलेले निवेदन**

बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत मुकेश सरवन म्हणाले, स्वच्छता कर्मचारी हे शहराच्या आरोग्याचे खरे रक्षक आहेत. त्यांच्या मागण्या योग्य आहेत आणि आयोग पालिका प्रशासन व राज्य सरकारसमोर त्यांचा योग्य पाठपुरावा करेल. कंत्राटी पद्धतीअंतर्गत होणारे शोषण थांबवण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आयोग कटिबद्ध आहे.

**संघाच्या मुख्य मागण्या :** स्वच्छता कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, अनेक वर्षांपासून कर्मचारी कमी वेतनावर काम करत आहेत. कर्मचाऱ्यांना कायम करावे, समान कामासाठी समान वेतन द्यावे आणि कर्तव्यावर असताना निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरी द्यावी.

## पुणे कृषि हॅकथॉन २०२६ मध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाला २५ लाखांचे प्रथम पारितोषिक




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१९, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी विद्यापीठ दि.१९ मे २०२६ रोजी कृषि विभाग महाराष्ट्र शासन आयोजित पुणे कृषि हॅकथॉन २०२६ या राज्यस्तरीय स्पर्धेत महात्मा फुले कृषि विद्यापीठाने घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यापीठाने विकसित केलेल्या संवेदक आधारित ताण विशिष्ट नत्र फवारणी यंत्र या नावीन्यपूर्ण प्रकल्पाला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते रुपये २५ लाखाचे कृषि यांत्रिकीकरण या विषयांतर्गत प्रथम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या प्रकल्पाच्या संशोधक टीमचे सदस्य डॉ.अवधूत वाळुंज यांनी सदरचा पुरस्कार स्वीकारला. डॉ.अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे विद्यार्थी डॉ. प्रणव पावसे आणि इंजि.भूमिका पांडे हे या प्रकल्पाच्या संशोधक टीमचे अन्य सदस्य असून हा प्रकल्प महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या संकल्पनेतून साकार झाला आहे. या प्रकल्पाचे मार्गदर्शक म्हणून डॉ.अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सचिन नलावडे यांनी काम पाहिले. या प्रयोगासाठी स्मार्ट आणि अचूक शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञान उत्कृष्टता केंद्रातील संवेदक सुविधांचा लाभ झाला. पिकांच्या गरजेनुसार आवश्यक तिथेच मोजून मापून नत्राची मात्रा देणे या तंत्रज्ञानामुळे शक्य होणार आहे. यामुळे नत्राच्या खतात बचत होऊन संतूलीत खतांचा वापर होईल. यामुळे शेतकर्यांचा नत्रयुक्त खतांवरील खर्च कमी होऊन पर्यावरणाचेही रक्षण होईल. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या या संशोधक टीमच्या ऐतिहासिक यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, संशोधन संचालक डॉ.प्रशांत बोडके, अधिष्ठाता डॉ.साताप्पा खरबडे आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ.गोरक्ष ससाणे यांनी विजयी संघाचे विशेष अभिनंदन केले आहे.

## पालम तालुक्यातील आजमाबाद गावाची डिजिटल जनगणना १०० टक्के पूर्ण

### वेळेपूर्वी काम पूर्ण केल्याबद्दल प्रगणक गुंडेवाड व पर्यवेक्षक जोगदंड यांचा तहसीलदारांच्या हस्ते गौरव




**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१९, पालम (परभणी) :** तालुक्यातील आजमाबाद गावाने डिजिटल जनगणनेचे काम १०० टक्के पूर्ण करून तालुक्यात एक आदर्श निमाण केला आहे. पालमचे तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे यांनी दिलेल्या मार्गदर्शनाचा आणि आवाहनाचा अवलंब करत आजमाबाद येथील कर्मचाऱ्यांनी हे उद्दिष्ट वेळेपूर्वीच यशस्वीरीत्या साध्य केले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संबंधित कर्मचाऱ्यांचा तहसील कार्यालयात विशेष सत्कार करण्यात आला. तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे यांनी तालुक्यातील सर्व नागरिकांना आणि प्रशासकीय यंत्रणेला डिजिटल जनगणनेचे काम गतीने व अचूकतेने पूर्ण करण्याचे आवाहन केले होते. या मोहिमेला प्रतिसाद देत आजमाबाद (HLB ००५२), येथे राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव ठेवून युद्धपातळीवर काम सुरू करण्यात आले होते.

आजमाबाद केंद्राचे प्रगणक रामकिशन गुणाजी गुंडेवाड. आणि पर्यवेक्षक अविनाश प्रल्हादराव जोगदंड यांनी अत्यंत चिकाटीने आणि परिश्रमाने गावातील प्रत्येक कुटुंबाची माहिती डिजिटल प्रणालीवर नोंदवून हे काम वेळेच्या आत पूर्ण केले. त्यांच्या या उत्कृष्ट आणि वेगवान कामाची दखल घेत तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे. व नायब तहसीलदार भागवत तेलभरे.साहेब यांच्या हस्ते दोन्ही कर्मचाऱ्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला आणि त्यांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप देण्यात आली. तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार समारंभाप्रसंगी तहसीलचे वरिष्ठ कर्मचारी साहेबराव राठोड, मारुती सुरनर यांच्यासह इतर महसूल कर्मचारी उपस्थित होते. आजमाबादच्या या यशामुळे तालुक्यातील इतर गावांमध्येही डिजिटल जनगणनेच्या कामाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## उष्णतेमुळे पाण्याची पातळी घटली; गाळ व शेवाळ वाढल्याने समस्या गंभीर




**अक्षराज : विकास दळवी**

**दि.१९, ठाणे :** शहरातील मासुंदा, उपवन, जेल तलाव आदी विविध तलावांमधून सध्या तीव्र दुर्गंधी येत असून नागरिक व पर्यटकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वाढत्या उष्णतेमुळे तलावांतील पाण्याची पातळी कमी झाली असून गाळ व शेवाळाचे प्रमाण वाढल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले.

सकाळी व संध्याकाळी तलाव परिसरात फिरण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी असते. सध्या सुट्ट्यांचा काळ असल्याने पर्यटकांची संख्याही वाढली आहे. मात्र तलाव परिसरात पसरलेल्या कुबट वासामुळे नागरिकांना नाक दाबून फिरावे लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही तलावांतील पाणी हिरवट झाले असून त्यामुळे परिसराच्या स्वच्छतेवरही परिणाम होत आहे.

महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी नुकतीच तलाव परिसराची पाहणी केली. विशेषतः मासुंदा तलावातील काही भागांत मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याचे निदर्शनास आले. उष्णतेमुळे पाणी आटल्याने गाळ आणि शेवाळ वाढून दुर्गंधी निर्माण होत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, तलावांतील दुर्गंधी कमी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. फ्लोटिंग वेटलँड्स आणि एरेशन प्रणालीचा वापर करून पाण्याची गुणवत्ता सुधारण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यासाठी काही ठिकाणी विशेष संरचना उभारण्यात आल्या आहेत.

पावसाळ्यापूर्वी तलावांतील गाळ काढण्याचे काम हाती घेण्यात येणार असून संबंधित ठिकाणी मोजमाप व मार्किंगची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसेच तलावांमध्ये जैविक प्रक्रियेद्वारे पाणी स्वच्छ ठेवण्यासाठी अतिरिक्त उपाययोजनांचेही नियोजन करण्यात आले आहे.

## सव्वा महिन्याच्या बाळाला आजी-आजोबांकडे सोपवत प्रतिक्षा श्रीवास्तव एम.एड. प्रवेश परीक्षेत राज्यात पहिली



> आई झाल्यानंतर करिअर आणि शिक्षण थांबते, हा समज केवळ एक भ्रम आहे. कुटुंबाचा खंबीर पाठिंबा आणि स्वतःची प्रबळ इच्छाशक्ती असेल, तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही. हे यश माझ्या संपूर्ण कुटुंबाच्या सहकार्यामुळेच शक्य झाले आहे.
>
> **- प्रतिक्षा श्रीवास्तव, राज्यात प्रथम**

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१९, विंचूर (नाशिक) :** जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते, याचे एक अत्यंत प्रेरणादायी उदाहरण लासलगाव येथे समोर आले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या महाराष्ट्र राज्य एम.एड. (M.Ed. CET) प्रवेश पात्रता परीक्षेत लासलगावच्या प्रतिक्षा श्रीवास्तव यांनी तब्बल ९९.६३ पर्सेंटाइल गुण मिळवत राज्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे.

अवघ्या सव्वा महिन्याच्या बाळाची जबाबदारी सांभाळत त्यांनी मिळवलेले हे यश थक्क करणारे आहे. प्रतिक्षा यांच्या या अभूतपूर्व आणि कौतुकास्पद यशाबद्दल सध्या लासलगाव परिसरासह संपूर्ण राज्यभरातून आणि शैक्षणिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**बाळाला आजी-आजोबांकडे सोपवून गाठले परीक्षा केंद्र**

प्रतिक्षा श्रीवास्तव यांच्या या यशाचा प्रवास सोपा नव्हता. परीक्षा अगदी तोंडावर असताना त्यांच्या घरात एका लहानग्या पाहुण्याचे आगमन झाले. परीक्षेच्या दिवशी आपले अवघ्या सव्वा महिन्याचे चिमुकले बाळ आजी-आजोबांच्या स्वाधीन करून त्या परीक्षा केंद्रावर पोहोचल्या. मातृत्वाची कर्तव्ये पार पाडत असतानाच त्यांनी शिक्षणाची ही उंच भरारी घेतली आणि राज्यात अव्वल येण्याचा पराक्रम केला.

**बी.एड. नंतर आता एम.एड. मध्येही 'नंबर वन'!**

विशेष म्हणजे, प्रतिक्षा श्रीवास्तव यांनी राज्यात प्रथम येण्याची ही पहिलीच वेळ नाही. यापूर्वी बी.एड. प्रवेश पात्रता परीक्षेतही (इ.एव. उएढ) त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम येण्याचा मान पटकावला होता. आता पुन्हा एकदा एम.एड. परीक्षेतही तोच इतिहास सुवर्णअक्षरांनी रचंथ करत त्यांनी शिक्षण क्षेत्रात आपली मोहोर उमटवली आहे.

**नवमातांसाठी ठरल्या प्रेरणास्थान**

अनेकदा बाळंतपणानंतर महिलांचे शिक्षण किंवा करिअर थांबते, असा एक सर्वसाधारण समज समाजात आहे. मात्र, बाळाच्या संगोपनाचे मोठे आव्हान समोर असतानाही वेळेचे अचूक नियोजन आणि अभ्यासातील सातत्य यांच्या जोरावर प्रतिक्षा यांनी हा समज खोटा ठरवला आहे. त्यांनी नवमातांसमोर एक नवा आणि आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे.

# राहुरी खुर्दमध्ये पाणी टंचाई गंभीर; नागरिकांचा बोअरवेलकडे वाढता कल

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.१९, राहुरी (अहिल्यानगर) :** राहुरी खुर्द ग्राम पंचायत हद्दीत सुरू असलेल्या तीव्र पाणीटंचाईमुळे नागरिकांचे हाल दिवसेंदिवस वाढत असून वारंवार खंडित होणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे अनेक नागरिकांनी आता स्वतःच्या खर्चाने घराजवळ बोअरवेल घेण्यास सुरुवात केली आहे.

मात्र, काही मोजक्या नागरिकांची पाण्याची अडचण दूर होत असली तरी इतर सर्वसामान्य नागरिकांना आजही पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असल्याचे चित्र गावात पाहायला मिळत आहे.ग्राम स्थांच्या मते, ज्यांच्याकडे आर्थिक क्षमता आहे त्यांनी घरगुती बोअरवेल घेतल्या आहेत. मात्र गरीब व सर्वसामान्य नागरिकांना आजही टँकर, हंडे व ड्रमच्या आधारे पाण्याची सोय करावी लागत आहे. त्यामुळे गावात पाणीप्रश्न अधिक गंभीर बनत चालल्याची भावना व्यक्त केली जात आहे. दरम्यान, गावात मोठ्या प्रम ाणात घेतल्या जाणाऱ्या बोअरवेलबाबतही अनेक प्रश्न





उपस्थित होऊ लागले आहेत.

ज्या नागरिकांनी बोअरवेल घेतल्या आहेत, त्यांची नोंद ग्रामपंचायतीकडे करण्यात आली आहे का? बोअर मारण्यासाठी ग्रामपंचायतीची अथवा संबंधित प्रशासनाची अधिकृत परवानगी घेण्यात आली होती का? याबाबत ग्रामस्थांकडून शंका उपस्थित करण्यात येत आहेत. जर प्रत्येक घरामध्ये स्वतंत्र बोअरवेल घेतली जात असेल, तर ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा विभागाचा नेमका उपयोग काय राहणार? असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

तसेच अनियंत्रित पद्धतीने बोअरवेल वाढत राहिल्यास भविष्यात भूजल पातळी आणखी खालावण्याचा धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती जाणकार नागरिकांनी व्यक्त केली आहे.ग्रामस्थांच्या मते, ग्रामपंचायतीकडून नियमित व सुरळीत पाणीपुरवठा होत नसल्यामुळे नागरिकांना नाईलाजास्तव खासगी पर्यायांचा आधार घ्यावा लागत आहे. मात्र, ही परिस्थिती भविष्यासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे शासनाने व संबंधित प्रशासनाने या प्रकाराची गंभीर दखल घेऊन गावातील पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम करावी, अनधिकृत बोअरवेलची चौकशी करावी तसेच भूजल संवर्धनासाठी कठोर नियमांची अंमलबजावणी करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# एस.टी चा प्रवास महाग होणार?

## इंधन दरवाढीच्या पार्श्वभूमीवर एस.टी भाडे वाढीचा प्रस्ताव विचाराधीन - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१९, मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाढत्या इंधन खर्चाच्या पार्श्वभूमीवर प्रवासी भाडेवाढीचा प्रस्ताव विचाराधीन असला, तरी तत्काळ भाडेवाढ करण्यात येणार नसल्याची माहिती परिवहन मंत्री तथा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

डिझेल दरवाढीच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर



तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे महामंडळावर वार्षिक सुमारे १२४ कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. एसटी महामंडळाला दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासते. सध्या इंडियन ऑईल कॉर्पोरेशनमार्फत डिझेलचा पुरवठा केला जात असून, म ागील आठवड्यात प्रति लिटर ८८.२१ रुपये असलेला दर आता वाढून ९१.३१ रुपये झाला आहे. त्यामुळे प्रति लिटर ३ रुपये १० पैशांची वाढ नोंदविण्यात आली आहे.

या दरवाढीमुळे म हामंडळाला दररोज अंदाजे ३३ लाख ७० हजार रुपयांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत असून, मासिक स्तरावर हा भार सुमारे १० कोटी रुपये, तर वार्षिक स्तरावर सुमारे १२४ कोटी रुपयांपर्यंत जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, एसटी महामंडळ सध्या आर्थिक अडचणींचा सामना करीत असून, एप्रिल २०२६ मध्ये महामंडळाला सुमारे ७६ कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. वाढत्या इंधन खर्चाचा थेट परिणाम म हामंडळाच्या आर्थिक स्थितीवर होत असून, भविष्यात प्रवासी भाडेवाढीचा निर्णय घेणे आवश्यक ठरू शकते. तथापि, कोणतीही भाडेवाढ तातडीने लागू करण्यात येणार नसून, केंद्र आणि राज्य शासनाच्या म ार्गदर्शनाखाली इंधन दरवाढीच्या अनुषंगाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य परिवहन प्राधिकरणाकडे म ान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे. संबंधित प्राधिकरणाची मान्यता मिळाल्यानंतरच अंतिम निर्णय घेण्यात येईल, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

एसटीने प्रवास करणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांवर कमीत कमी आर्थिक भार पडावा यासाठी शासन विविध पर्यायांचा विचार करीत असून, इंधन बचत, ई-बसचा वाढता वापर, खर्च नियंत्रण तसेच म हसूलवाढीच्या उपाययोजनांवर विशेष भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी एसटी ही अत्यावश्यक सार्वजनिक वाहतूक सेवा असून, सेवा अबाधित राखत आर्थिक संतुलन कायम ठेवणे हे महामंडळासमोरील प्रमुख आव्हान असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# स्कॉलरशिप परीक्षेत 'के.रामलू' शाळेचा डंका



### आठवी चे ३६ तर पाचवी चे ३८ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.१९, कुंडलवाडी (नांदेड) :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) आणि पूर्व माध्यमिक (इयत्ता ८वी) शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. या अत्यंत प्रतिष्ठेचा परीक्षेत नेहम ीप्रमाणे यंदाही के.रामलू पब्लिक स्कूल या शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेची चमक दाखवत घवघवीत यश संपादन केले आहे.

शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत (Merit List) स्थान मिळवून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. शाळेचे चमकते तारे (गुणवंत विद्यार्थी) यंदाच्या परीक्षेत शाळेचा निकाल उत्कृष्ट लागला असून, पाचवी मधील ३८ विद्यार्थी पास झाले तर आठवी मधील ३६विध्यार्थी पास झाले खालील विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले.

इयत्ता ८ वी (पूर्व माध्यमिक) शाळेतून पहिल्या तीन मध्ये आलेले विध्यार्थी सर्व प्रथम आलेला विध्यार्थी कु.आशिष अंजया जायेवार मिळालेले २४२ गुण/टक्के ८१.२० द्वितीय आलेला श्रेयश संजय कासलोड २२४ मिळालेले गुण/टक्के ७५.१६ व तृतीय आलेला विद्यार्थी मनोज म ाधव लोलापोड २०८ मिळालेले गुण टक्के ६९.७९ इयत्ता ५वी (पूर्व उच्च प्राथमिक) परीक्षेत शाळेतून पहिल्या तीन मध्ये आलेले विध्यार्थी शाळेतून दोन विध्यार्थी प्रथम आले यात कु. आयुष साईनाथ बुड्डावार २०० मिळालेले गुण टक्के ६७.११ सेहान खुबेब अब्दुलखालिद शेख २००मिळालेले गुण/टक्के ६७.११ द्वितीय आलेली विद्यार्थिनी श्रेया गजानन लिमशेट्टे १८८मिळालेले गुण टक्के ६३.०८ तृतीय आलेली विद्यार्थिनी श्रद्धा मेघनाथ पवार मिळालेले गुण १८४ टक्के ६१.७४ मिळालेस्कॉलरशिप परीक्षेच्या कठीण काठिण्यपातळीवर मात करत विद्यार्थ्यांनी हे यश खेचून आणले आहे. वर्षभर शिक्षकांनी घेतलेले जादा तास, सराव परीक्षा आणि विद्यार्थ्यांनी केलेले सातत्यपूर्ण परिश्रम यामुळेच हे यश शक्य झाले, अशा भावना पालकांनी व्यक्त केल्या.

शाळेच्या या यशाबद्दल कुंडलवाडी शहर व परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. शाळेच्या या दैदिप्यमान यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष साईरेड्डी ठक्कुरवार सचिव यशवंत संगमवार, संचालिका रमा ठक्कुरवार प्रिंसिपल एस जाधव व्हाय प्रिंसिपल एम सपना आणि सर्व शिक्षक वृंदांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. यावेळी शाळेचे प्रिंसिपल जाधव यांनी बोलताना म्हणाले कि आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद आहे. केवळ पाठांतर न करता संकल्पना समजून घेण्याच्या वृत्तीमुळेच विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले आहे. या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांची मेहनत आणि आमच्या स्कॉलरशिप मार्गदर्शक शिक्षक टीमला जाते.

# बळीराजा परिवार व रामराव पाटील आयुर्वेदिक महाविद्यालयाकडून भव्य आरोग्य शिबिर संपन्न

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१९, पालम (परभणी) :** पालम तालुक्यातील प्रसिद्ध जागृत देवस्थान म्हणून ओळख असलेल्या भोगाव येथील मारुतीच्या दर्शनासाठी शनि अम ावास्येनिमित्त मराठवाडाभरातून हजारो भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

या भाविकांची मोफत आरोग्य तपासणी व्हावी, या सामाजिक उद्देशातून परभणी जिल्ह्यातील श्री बळीराजा शिक्षण संस्था, सोमेश्वर तसेच पूर्णा येथील राम राव पाटील आयुर्वेदिक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या आरोग्य शिबिरामध्ये हजारो भाविकांची विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर आवश्यक औषधांचे मोफत वाटप करण्यात आले. तसेच भाविकांसाठी महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली होती. या उपक्रमामुळे दर्शनासाठी आलेल्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला.

पालम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा बळीराजा परिवाराचे अध्यक्ष भाई तुषार भैय्या गोळेगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे आरोग्य शिबिर यशस्वीरित्या पार पडले.

यावेळी माजी जिल्हा परिषद सभापती चित्राताई गोळेगावकर, बळीराजा शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष योगेश भैय्या गोळेगावकर, प्राचार्य डॉ. आत्माराम आरसुळे, प्रशासकीय अधिकारी गिरीश सोळंके तसेच माजी प्राचार्य डॉ. एच. टी. सातपुते यांची प्रम ुख उपस्थिती होती.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी बळीराजा परिवारातील विविध विभाग प्रमुख, डॉक्टर, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे भाविकांकडून कौतुक करण्यात आले.

# थोडक्यात

## अपूर्ण असणाऱ्या मुंबई-गोवा महामार्गावरील टोलवसुली त्वरित बंद करा
## २१ तारखेला रायगड प्रेस क्लबतर्फे ठिय्या आंदोलन

**अक्षराज : मितेश जाधव**



**दि.१९, पेण (रायगड) :** अपूर्ण अवस्थेत असलेल्या मुंबई-गोवा महामार्गावर सुरू करण्यात आलेली टोलवसुली तात्काळ बंद करण्यात यावी. तसेच महामार्गाचे काम पूर्ण होऊन अधिकृत उद्घाटन होईपर्यंत टोलवसुली थांबवावी, अशी ठाम मागणी रायगड प्रेस क्लबच्या वतीने करण्यात आली आहे. दरम्यान दिनांक २१ मे २०२६ रोजी पेण तालुक्यातील खारपाडा टोल नाक्यावर रायगड प्रेस क्लबच्या वतीने सर्व पत्रकार ठिय्या आंदोलन करणार आहेत. हे आंदोलन मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त तसेच रायगड प्रेस क्लबचे संस्थापक एस.एम. देशमुख यांच्या नेतृत्वाखाली तसेच मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर आणि रायगड प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.

गेल्या आठवड्यात सुरू केलेला खारपाडा टोल नाका त्वरित बंद करावा अशी मागणी करित या संदर्भात दिनांक १८ मे २०२६ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पनवेल कार्यालयातील अधिकाऱ्यांना रायगड प्रेस क्लबच्या शिष्टमंडळाने निवेदन सादर केले. महामार्गाचे अनेक भाग अद्याप अपूर्ण असून रस्त्याच्या कामांमुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अशा परिस्थितीत नागरिकांकडून टोल आकारणे अन्यायकारक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. मात्र तरीही खारपाडा टोल नाका बंद करण्यात आला नाही. त्यामुळे रायगड प्रेस क्लब च्या वतीने २१ मे रोजी खारपाडा टोल नाक्यावर या आंदोलन करण्यात येणार आहे. तरी या आंदोलनाकरिता रायगड प्रेस क्लबच्या सर्व पत्रकारांनी मोठ्या संख्येने तसेच जिल्ह्यातील सामाजिक संस्थेच्या पदाधिकारी आणि सदस्यांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे कोकण विभागीय सचिव मनोज खांबेव जिल्हा प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे यांनी केले आहे.

## सेनापती बापट मल्टिस्टेट फसवणूक प्रकरणातील आरोपींना अटक करा



## पालकमंत्री विखे पाटील यांना निवेदन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१९, पारनेर (अहिल्यानगर) :** सेनापती बापट मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीने पारनेर तालुक्यातील सुमारे ३० हजार ठेवीदारांची १८० कोटी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी संतापलेल्या ठेवीदारांनी शनिवारी पारनेर दौऱ्यावर असलेल्या जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. ठेवीदारांनी विखे पाटील यांना सविस्तर निवेदन देऊन या प्रकरणातील संथ पोलीस तपासाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली, तसेच दोषींवर कडक कारवाई न झाल्यास उपोषणाचा इशारा दिला. याप्रसंगी एकनाथ औटी, काकासाहेब काळे, संपत चेडे, निलेश गाडगे, अजय औटी, महदू लोळगे, राजेंद्र गवळी, पंढरीनाथ साळवे आणि अ‍ॅड. ऋषिकेश शिंदे आदी प्रमुख ठेवीदार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.ठेवीदारांनी दिलेल्या निवेदनानुसार, सेनापती बापट पतसंस्थेच्या चेअरमन, कार्यकारी अधिकारी, संचालक मंडळ आणि व्यवस्थापकांवर ११ जून २०२५ रोजी पारनेर पोलीस ठाण्यात एमपीआयडी कायदा आणि भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा सत्र न्यायालयाने सर्व आरोपींचे अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले होते. मात्र, त्यानंतर आरोपींनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात धाव घेतली.

पोलीस प्रशासनाने उच्च न्यायालयात ठेवीदारांची बाजू योग्य पद्धतीने मांडली नसल्यामुळेच मुख्य आरोपींना अंतरिम जामीन मिळाला असून, शेकडो कोटी रुपये गडप करून आरोपी आज उजळ माथ्याने फिरत असल्याचा थेट आरोप ठेवीदारांनी केला आहे. पतसंस्थेच्या २९ शाखांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आणि वृद्धांनी आपल्या घामाचा पैसा या पतसंस्थेत ठेवला होता. संस्थेच्या २०२३-२४ च्या ऑडिट रिपोर्टनुसार ही मुद्दल रक्कम तब्बल १८० कोटी ३५ लाख रुपये इतकी आहे. ठेवींची मुदत संपूनही ठेवीदारांना अद्याप एकही रुपया परत मिळालेला नाही. या आर्थिक संकटामुळे अनेक कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली असून त्यांचे भविष्य अंधारात सापडले आहे. पोलीस अधीक्षक कार्यालयाशी वारंवार पत्रव्यवहार करूनही कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्याचे त्यांनी सांगितले. या गंभीर प्रकरणात फरार आणि जामिनावर असलेल्या सर्व आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी ठेवीदारांनी केली आहे.

## नगरसेविका शिंदे यांच्या प्रयत्नाने उपजिल्हा रुग्णालयात थंड पाण्याची व्यवस्था

**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.१९, शहापूर (ठाणे) :** सध्या अतिऊष्णतेमुळे तापमान ४५ अंशाच्या वर गेले आहेत, इतक्या ऊन्हात आपल्या कामानिमित्त तहसिलदार कार्यालय तसेच ऊप जिल्हा रुग्णालय शहापूर येथे रूग्णांना तसेच येणाऱ्या नातेवाईकांना थंड पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे आणि हि च अडचण ओळखून नगरसेविका रजनी शिंदे यांनी शहापूर नगरपंचायतीच्या मासिक मीटिंगमध्ये नागरिकांच्या सुविधेसाठी एक महत्त्वाचा ठराव मांडून तो मंजूर करून घेतला होता. त्यांच्या याच विशेष प्रयत्नांमुळे आणि सततच्या पाठपुराव्यामुळे ठरावातील महत्त्वाच्या प्रस्तावाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली असुन सोमवार पासून तहसीलदार कार्यालय तसेच ऊप जिल्हा रुग्णालय शहापूर थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. पाणी वाटप शुभारंभ प्रसंगी सौ. गायत्री भांगरे (नगराध्यक्षा), रजनी संतोष शिंदे, श्री.कोंडे (अधिकारी, पाणीपुरवठा विभाग), गायकवाड साहेब मुख्याधिकारी उपस्थित होते. या स्तुत्य उपक्रमासाठी त्यांना मुकादम काशिनाथ, कमलाकर वेखंडे, नगरपंचायतचे सर्व नगरसेवक तसेच या कामात मोलाचे सहकार्य करणारा शहापूर नगरपंचायतीचा सर्व कामगार वर्ग आदींचे सहकार्य लाभले. ऐन उन्हाळ्यात थंड पाण्याची सोय ऊपलब्ध करून दिल्याबद्दल नगरसेविका रजनी संतोष शिंदे यांचे संपूर्ण शहापूर तालुक्यातून कौतुक होच आहे आणि आभार मानले जात आहेत.